मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार दि.२१/०४/२०१६ ते २८/०२/२०१७ या कालावधीकरिता गट-ड चे ग्रेड-१ मजूर हे अधिसंख्य पद निमार्ण करून, श्री. जटाळे यांना नियुक्ती देण्यास व मजूरी/ वेतनाच्या फरकाची रकम अदा करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-२०१६/प्र.क्र.१२३/१३-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
तारीख: १८ सप्टेंबर,२०१९

<u>वाचा:-</u>

१) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. बीवायझेड-१३१६/१३७८६/प्र.क्र.३३/आस्था-३/२०२/१९. दि.१/०२/२०१९.

२) विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांचे पत्र क्र.विकृअससं/अ-७/रि.पी.७१७-१८/ श्री. जटाळे/२२०५/२०१९ दि.१३/६/२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. सुभाष शंकर जटाळे, रोजंदारी मजूर, फळरोपवाटिका दारव्हा, जि. यवतमाळ. यांच्या न्यायालयीन प्रकरणा संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या (अपिल) रिट पिटिशन क्र.७१७/२००८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१२/२/२०१८ रोजी दिलेल्या अंतरिम न्यायनिर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत विभागीय सह संचालक अमरावती, यांनी कृषि आयुक्तालया मार्फत शासनास "श्री.जटाळे यांना गट-ड च्या ग्रेड १ मजूर या पदावर पूर्व लक्षी प्रभावाने दि.२१/४/२०१६ ते दि.२८/०२/२०१७या कालावधीतील मजूरी / वेतनाच्या रु.१४,५८१/- इतक्या रकमेच्या फरकासह नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

<u>शासन निर्णय:-</u>

श्री. सुभाष शंकर जटाळे, रोजंदारी मजूर यांच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.१२/०२/२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार श्री. जटाळे यांना पूर्व लक्षी प्रभावाने दि.२१/४/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ या कालावधीकरिता गट-ड च्या ग्रेड १ मजूर पदावर अधिसंख्य पद निर्माण करण्यास तसेच सदर कालावधितील मजूरी/वेतनाच्या रु.१४,५८१/- इतक्या रकमेच्या फरकासह नियुक्ती देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

श्री. जटाळे,रोजंदारी मजूर यांना नियुक्ती नंतर द्यावयाची दि.२१/४/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ या कालावधितील मजूरी/ वेतनाच्या फरकाची रकम अदा करण्यासाठी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, दिनांक १७/४/२०१५ भाग पहिला,उप विभाग-दोन अनु.क्र.७ नुसार वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आलेले

आहेत. त्याअन्वये न्यायनिर्णयानुसार देय ठरणारी रक्कम खातरजमा करुन शासनाचे प्रचलित नियम,अटी व शर्ती व आदेशांचे अनुपालन करण्यात यावे. तसेच या प्रकरणी कोणतीही प्रशासकीय वा वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

सदरचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६५/का.१२ दि.२६/०३/२०१९ सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२८२/आ.पु.क दि.२४/०६/२०१९ रोजीच्या अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१४१८०९५९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्रांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.09.18 14:24:12 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत अग्रेषितः-

१) प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय. मुंबई.
२) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय. मुंबई.
३) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.
४) प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग,मंत्रालय. मुंबई.
५) सह सचिव (आस्थापना) कृषि पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.
६) सह सचिव (फलोत्पादन) कृषि पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.

प्रतः-

१) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई/ नागपूर.
४) सह संचालक (आस्थापना),कृषि आयुक्तालय,पुणे.
५) विभागीय कृषि सह संचालक , अमरावती.
६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,यवतमाळ,
७) जिल्हा कोषगार अधिकारी, यवतमाळ,
८) वित्त विभाग (व्यय-१), / (आ.पु.क), मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती-१३-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय. मुंबई.